# सातारा जिल्हा परिषद,सातारा

---

**प्रेसनोट : दि. 07/04/2021**

**विषय :- कोविड-१९ लसीकरणाबाबत**

**सातारा जिल्ह्यातील** 45 **वर्षे व त्यावरील वयोगटातील सर्व व्यक्तींचे कोविड-**19 **लसीकरणाची मोहिम प्राथमिक आरोग्य केंद्रे, व उपकेंद्रांमध्ये सुरु करण्यात आली आहे. जास्तीत जास्त लोकांची नोंदणी व लसीकरण व्हावे यासाठी प्रशासनामार्फत व्यापक नियोजन करण्यात आले. त्यामुळे जिल्ह्यातील नागरीकांनी लसीकरणासाठी अत्यंत चांगला प्रतिसाद दिला असून एक आठवडयाच्या कालावधीत तब्बल** 90,136 **व्यक्तींना लसीकरण करण्यात आले आहे. दि.**31/3/2021 **रोजी** 4789, **दि.**1/4/2021 **रोजी** 8504, **दि.**2/4/2021 **रोजी** 6202, **दि.**3/4/2021 **रोजी** 12731, **दि.**4/4/2021 **रोजी** 9296, **दि.**5/4//2021 **रोजी** 21397, **दि.**6/4/2021 **रोजी** 27217, **असे एकूण** 90136 **व्यक्तींना लसीकरण करण्यात आले आहे. सद्यस्थितीत लसीचा साठा संपलेला असलेने उद्यापासून लसीचा साठा उपलब्ध होईपर्यंत लसीकरण मोहिम थांबवावी लागत आहे. आजपर्यंत जिल्ह्यात एकूण** 2,56,434 **एवढे लसीकरण पूर्ण झालेले आहे.**

सातारा जिल्ह्यामध्ये 1/4/2021 पासून 45 वर्षावरील सरसकट व्यक्तींना लसीकरण सुरु करण्यात आले असून जिल्ह्यामध्ये प्रशासनाच्यावतीने प्रभावी नियोजन करुन नागरीकांमध्ये जागरुकता निर्माण केल्यामुळे नागरीकांनी लसीकरणासाठी प्रचंड प्रतिसाद दिला असून लसीची मागणी शासनस्तरावर नोंदविण्यात आली असून लस उपलब्ध होताच पुन्हा वेगाने लसीकरणाची मोहिम प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रामध्ये पुढे सुरु करण्यात येईल.

- **विनय गौडा जी.सी.**
  **मुख्य कार्यकारी अधिकारी**